महाराष्ट्र शासन

**<u>महाराष्ट्र राज्य-सामाजिक अंकेक्षण व पारदर्शकता सोसायटी</u>**

९ वा मजला, नवीन प्रशासन भवन,

मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२

# कंत्राटी तत्वावर करार पद्धतीने नियुक्ती

महाराष्ट्र राज्य-सामाजिक अंकेक्षण व पारदर्शकता सोसायटी, मंत्रालय, मुंबई या कार्यालयात कंत्राटी तत्वावर करार पद्धतीने वर्ग-१ मधील सेवानिवृत्त शासकीय अधिकाऱ्यांमधून “उप संचालक” या पदावरील नियुक्तीसाठी विहीत अटी व शर्तींची पूर्तता करणाऱ्या इच्छुक उमेदवारांकडून विहीत नमुन्यात दिनांक ०६/०९/२०२२ पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहेत. सदर पदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या याबाबतचा सविस्तर तपशिल शासनाच्या **www.mahaegs.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

स्वाक्षरी/-
संचालक,
महाराष्ट्र राज्य-सामाजिक अंकेक्षण व
पारदर्शकता सोसायटी, मंत्रालय, मुंबई-३२

# महाराष्ट्र शासन

**महाराष्ट्र राज्य सामाजिक अंकेक्षण व पारदर्शकता सोसायटी**
**९ वा मजला, नवीन प्रशासन भवन, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.**

## उप संचालक पदावर करार पद्धतीने नियुक्ती

महाराष्ट्र राज्य सामाजिक अंकेक्षण व पारदर्शकता सोसायटीमध्ये करार पध्दतीने नियुक्तीसाठी खालीलप्रमाणे निश्चित केलेल्या विविक्षित कामकाजासाठी अटी व शर्तीची पूर्तता करणाऱ्या व राज्य शासनाच्या गट- अ पदावरुन सेवानिवृत्त झालेल्या उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

**कर्तव्ये व जबाबदाऱ्या :**

- संचालक व सहसंचालक यांना सोसायटीचे प्रशासकीय कामकाज सुरळीत पार पाडण्यासाठी मदत करणे.
- संचालक व सहसंचालक यांच्या अनुपस्थितीत सोसायटीच्या कामकाजावर देखरेख ठेवणे.
- सोसायटी आणि शासनाचे संबंधित विभाग यांच्यात संपर्क अधिकारी म्हणून काम करणे.
- सोसायटीच्या कार्यालयात आवश्यकतेनुसार कर्मचाऱ्यांची भरती, नियुक्ती/नुतनीकरण/ कर्मचाऱ्यांचे केलेले करार आणि सर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या कामगिरीचे मुल्यांकन यासंदर्भात सोसायटीच्या प्रशासकीय प्रक्रियेचे परिक्षण व देखरेख करणे.
- कार्यालयीन उपकरणे आणि त्यातील वार्षिक कराराची देखभाल व सुविधा पुरविणे विषयक कामकाज पार पाडणे.
- सोसायटीचा सर्व कारभार व नस्त्यांची पडताळणी करण्याची जबाबदारी राहील. तसेच सर्व आवश्यक नोंदवह्यांची देखभाल केली जाते तसेच सर्व पत्रव्यवहाराची वेळेवर विल्हेवाट लावली जाते यावर लक्ष ठेवण्याची जबाबदारी राहील.
- सोसायटीशी संबंधित विधानमंडळाचे कामकाज, माहिती अधिकारा संबंधित कामे तसेच इतर महत्त्वाच्या पत्रांना योग्य प्रतिसाद देण्यासाठी जबाबदार राहतील.
- सोसायटीतील कर्मचाऱ्यांमधील कामाचे वाटप करणे आणि संचालक आणि सहसंचालक यांच्या सल्ल्यानुसार सर्व स्तरांवर कर्मचाऱ्यांच्या कामाचा आढावा घेणे आणि निरीक्षण करणे.
- सोसायटीच्या कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांच्या दौऱ्यासंबंधि टूर डायरीची पडताळणी करणे व संचालक यांना सादर करणे.
- कार्यालयीन सेवा यादीतील प्रतिनियुक्त अधिकारी व कर्मचाऱ्यांची सेवापुस्तके किंवा सेवा अभिलेख योग्य प्रकारे ठेवल्या पाहिजेत याची खात्री करणे.

- सर्व कर्मचाऱ्यांच्या कामावर देखरेख ठेवणे आणि कार्यालयीन शिस्त व सजावट राखली जाईल हे सुनिश्चित करणे.
- सोसायटीच्या तिमाही, सहामाही आणि वार्षिक अहवालाच्या तयारीसाठी संचालकांना सहाय्य करणे.
- सोसायटीच्या राज्यस्तरीय कार्यक्रमांच्या आयोजनासाठी संचालकांना मदत करणे.
- संचालक आणि सहसंचालक यांनी नेमून दिलेली इतर कोणतीही कामे करणे.

**करार पध्दतीने नियुक्तीच्या पात्रता व अटी-शर्ती :**

१. उमेदवार शासकीय सेवेतून गट- अ दर्जाच्या पदावरुन सेवानिवृत्त झालेला असावा.

२. उमेदवाराला महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेविषयक ज्ञान व कामाचा अनुभव असावा. मराठी, इंग्रजी भाषा अवगत असावी.

३. उमेदवाराचे वय सुरुवातीच्या नियुक्तीच्या दिनांकास ६५ वर्षापेक्षा जास्त नसावे.

४. शासन सेवेत असताना उमेदवाराविरुध्द कोणतीही शिस्तभंग विषयक कारवाई झालेली नसावी किंवा प्रलंबित नसावी.

५. सेवा काळात सेवा समाधानकारक नसल्यास एकतर्फी काढून टाकण्याचा अधिकार सोसायटीस राहील.

६. इच्छुक उमेदवाराने आपला अर्ज नाव, पत्ता, संपर्क क्रमांक, शासकीय कामाचा अनुभव इत्यादी तपशिलासह स्वत:चे छायाचित्र डकवून, संचालक, महाराष्ट्र राज्य सामाजिक अंकेक्षण व पारदर्शकता सोसायटी, ९ वा मजला, नवीन प्रशासन भवन, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२ यांच्या नावे दि. ६ सप्टेंबर, २०२२ पर्यंत कार्यालयीन वेळेत पोहचेल अशा बेताने पाठवावा.

७. मोठ्या प्रमाणात अर्ज प्राप्त झाल्यास, शैक्षणिक अर्हता, अनुभव, कार्यक्षेत्रातील सेवेचा कालावधी इत्यादी बाबींचा प्राधान्याने विचार करुन मुलाखतीद्वारे पात्र उमेदवारांची निवड करण्यात येईल.

स्वाक्षरी/-

संचालक,

महाराष्ट्र राज्य-सामाजिक अंकेक्षण व

पारदर्शकता सोसायटी, मंत्रालय, मुंबई-३२